**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३०९९** **दि. २६/०९/२०१९**

## स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे शहर

## मुसळधार पावसात घरामध्ये पाण्यात अडकलेल्या नागरिकांना मदत केले बाबत

दिनांक २५/०९/२०१९ रोजी संपुर्ण पुणे शहर आणि परिसरात मोठ्या प्रमाणात पडलेल्या मुसळधार पावसाने हाहाकार केला. त्याच दरम्यान रात्रौ २३.३० वा. चे सुमारास श्रीमती स्वप्ना गोरे, पोलीस उपआयुक्त परिमंडळ १ पुणे शहर यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.ब्रम्हानंद नाईकवाडी, स्वारगेट पोलीस स्टेशन, पुणे यांना फोन करुन कळविले कि, गुरुराज सोसायटी पुणे सातारा रोड सहकारनगर या ठिकाणी अतिवृष्टीमुळे सोसायटीत पाणी शिरले असुन, सोसायटी मधील फ्लॅटमध्ये वयस्कर लोक अडकलेले आहेत आपण तात्काळ पोहचा असा संदेश दिलेने. असा संदेश प्राप्त होताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.ब्रम्हानंद नाईकवाडी यांनी क्षणाचाही विलंब न करता पोलीस उपनिरीक्षक श्री.समाधान जर्नादन कदम, पो.हवा. ४४९ श्री.निवास केंजळे, पोलीस नाईक ७६१० श्री.विजय कुंभार, पोलीस नाईक ७०१० श्री.अमोल मंकराज, पोलीस शिपाई १०१९० श्री.समाधान धनवे यांचेसह जीवाची पर्वा न करता मुसळधार पावसात गुरुराज सोसायटी, चव्हाणनगर, पुणे येथे पोहचले. वयस्कर नागरिकांना घराच्या बाहेर पडता येत नव्हते अशा नागरिकांना वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.नाईकवाडी यांनी आपल्या पाठीवर घेऊन अंधाराच्या ठिकाणाहुन केवळ बॅटरीच्या उजेडात बाहेर काढले. तसेच स्वारगेट पोलीस स्टेशन कडील पोलीसांनी नागरिकांचे मदतीने रेस्क्यु ऑपरेशन राबवुन गुरुराज सोसायटीमधील श्री सुहास सदाशिव बापट,वय ६५ वर्षे,श्री विजय मोरडे,वय ६५ वर्षे, व इतर दोन असे चार जेष्ठ नागरीक, श्री सुनिल शिर्के,वय ४३ वर्षे, श्री समीर कुलकर्णी,वय ३४ वर्षे, कु.सायली हेमांतकुमार अहिरे,वय २८ वर्षे,कु.प्रांजली हेमांतकुमार अहिरे,वय २४ वर्षे, कु. विक्रम धनंजय सावंत,वय २१ वर्षे यांना पाण्यातुन सुखरुप बाहेर काढले.







